# 'खेळ' कृत्रिम बुद्धिमत्तेचा !

क्रीडा विश्वातून



**सुनील वालावलकर**
क्रीडा संघटक

**कृत्रिम बुद्धिमत्ता** अर्थात 'एआय'ने सगळे जग आपल्या कवेत घेतल्याचे मानले जात आहे. गेल्या पाच वर्षांत 'एआय'ने जेवढे आश्चर्यकारक चमत्कार दाखवले नाहीत, त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पटीच्या घटना या पुढच्या काळात आपल्याला बघायला मिळणार आहेत. जेव्हा, सर्वच क्षेत्र कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावाखाली जात आहेत, अशावेळी क्रीडा क्षेत्र 'एआय'पासून मुक्त राहू शकणार नाही. म्हणूनच, क्रीडा क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कोणते बदल घडत आहेत किंवा घडणार आहेत, याची दखल आपल्याला घ्यावीच लागेल.

खेळाडूंच्या संपूर्ण शरीराचा ताबा मिळवणे कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे शक्य होणार आहे. शरीरातील कोणता स्नायू बळकट आहे, कोणता अवयव कमजोर आहे, याची अचूक माहिती गोळा करून त्याची सांगड क्रीडा प्रकारातील कौशल्याशी घालून त्यानुसार खेळाडूंच्या प्रशिक्षणाचे व्यवस्थापन ठरविण्यात येणार आहे. यापुढे प्रशिक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्तेमार्फत खेळाडूंच्या मानसिक आणि शारीरिक बदलांचा अचूक अंदाज बांधता येणार आहे. त्यामुळे खेळाडूंच्या दुखापती आटोक्यात येण्याबरोबरच त्यांच्या विजयाच्या शक्यताही उंचावणार आहेत.

**कृत्रिम बुद्धिमत्ता जशी खेळाडूंच्या शरीराचा ताबा घेणार आहे, तशीच क्रीडा प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्यसुद्धा गाजवणार आहे. प्रेक्षक कोणत्या खेळाडूला जास्त पसंती देतात, इथपासून भरगच्च स्टेडियममध्ये कोणती व्यक्ती, कोणत्या सीटवर बसली आहे याची इत्यंभूत माहिती गोळा करणे 'एआय'मुळे शक्य होणार आहे. क्रीडाप्रेमी आणि त्यांच्या पसंतीचे खेळाडू यांच्यातला संवाददूत म्हणून काम** करणे 'एआय'ला आता शक्य होणार आहे. एका बाजूला खेळाडूंची गुणवत्ता उंचवायची आणि दुसऱ्या बाजूला क्रीडा प्रेक्षकांची संख्याही वाढवायची, अशी दुहेरी कामगिरी 'एआय' करणार असून, त्याचा अंतिम फायदा क्रीडा उद्योग क्षेत्रातील प्रत्येक घटकाला होणार आहे. क्रीडा साहित्य बनविणाऱ्या कंपन्या एका नव्या क्रांतीच्या उंबरठ्यावर उभ्या आहेत. कारण, 'एआय'मुळे रॅकेट आणि बॅटला एक सेन्सर बसविण्यात येईल. ज्यामुळे खेळाडूच्या प्रत्येक हालचालीची नोंद प्रशिक्षकाच्या लॅपटॉपमध्ये घेतली जाईल. नेमक्या कोणत्या क्षणी खेळाडूकडून गफलत होते आणि ती चूक कशामुळे झाली याचे विश्लेषण 'एआय'मार्फत शक्य होणार आहे. अशा तांत्रिक करामती फुटबॉल, गोल्फ, जिम, मॅरेथॉन, सायकलिंग आणि अन्य खेळांत शक्य होणार आहेत.

खेळाडूंच्या बुटांमध्ये अशी एक चीप बसविली जाणार आहे, ज्यामुळे प्रत्यक्ष मैदानात खेळाडू खेळताना त्याच्या हृदयाचे ठोके किती आहेत? कोणता स्नायू खेळाडूला त्रास देतो, याची अचूक माहिती त्याच क्षणी प्रशिक्षकाकडे उपलब्ध होईल. त्यामुळे, ऐन सामन्यामध्ये कोणत्या **खेळाडूला माघारी पाठवायचे, कोणाला विश्रांती द्यायची, असे निर्णय घेणे प्रशिक्षकाला शक्य होणार आहे. क्रीडांगणातील प्रत्येक खेळाडू, चेंडू आणि अन्य साहित्यांवर 'एआय'ची बारीक नजर असल्याने निर्णय देणे यापुढे बिनचूक होणार आहे. 'एआय'च्या मदतीने निर्णय देताना पंचांकडून होणारी मानवी चूक यापुढे टाळली जाऊ शकते.**



## असाही उपयोग...

क्रीडा पत्रकारांनासुद्धा कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग होईल. सामन्याचे गुण आणि खेळाडूंच्या कामगिरीचे आकडे एका झटक्यात तेही बातमीच्या स्वरूपात पत्रकारांच्या मोबाइलमध्ये जमा होतील. एआयवर आधारीत कार्यप्रणाली अमेरिकन बेसबॉल लीगने वापरण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या प्रत्येक खेळाडूच्या प्रत्येक मिनिटाचा हिशोब येऊ लागला आहे. याआधारे, खेळाडूंवरील बोली वरखाली होते.

## अतिजबाबदारीने वापर आवश्यक

'एआय'मुळे क्रीडा क्षेत्राचा विकास आणि विस्तार होण्याबरोबरच काही नवीन आव्हानेही येणार आहेत. एआय मानवी कौशल्यावर कुरघोडी करणारी असल्यामुळे यापुढे मानवी अस्तित्व निरर्थक ठरण्याची शक्यता वाढली आहे. अशा काळात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर अतिजबाबदारीने करणे योग्य ठरेल.